I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 291-298
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या राजवटीत राबविलेल्या धोरणांमध्ये सध्याच्या शाश्वत विकास ध्येयांचे प्रतिबिंब

चंद्रशेखर नामदेव गौरकार
अर्थशास्त्र विभाग, एस. बी. महाविद्यालय, अहेरी. ता. अहेरी, जि. गडचिरोली.
*Corresponding Author: gaurkarshekhar@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

औद्योगिक क्रांतीमुळे विकासाला चालना मिळालीत्यामूळे जगात सर्वत्र आमूलाग्र बदल घडुन आलेला दिसतो. त्या सर्व बदलांचे बरे, वाईट परिणामही घडुन आलेले दिसतात. तसेच हा विकास कुठेतरी मानवी जनजीवन सुरळीतपणे चालण्याकरीता बाधक ठरणाराही दिसतो. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यामूळे सध्या जगापुढे जागतिक उष्णतेचे,जल,जंगल,जमीन,वायु,जैवविविधतेचे फार मोठे संकट निर्माण झालेले आहे. याच दृष्टिने मानवी विकास आणि पर्यावरणाचे संतुलन अबाधित ठेवण्याकरीता शाश्वत मुल्यांची गरज भासलेली आहे. त्यामुळेच संयुक्त राष्ट्र संघटनेने २०१५ ते २०३० या कालावधी करीता शाश्वत विकास ध्येय निर्धारित केलेली असून त्यांची अंमलबजावणी सर्व विकसीत व विकसनशील राष्ट्रांव्दारे विविध स्तरांवर केली जात आहे. याशाश्वत विकास ध्येयांचे प्रतिबिंब महानराजाछत्रपती शिवाजी महाराज यांच्या ध्येय,धोरणात दिसुन येते. त्यांनी त्यांच्या राजवटीमध्ये कृषी,जल,जमीन,जंगल, हवा, पर्यावरण, समुद्र,महीला,संरक्षण,उद्योग,व्यापार अशा सर्व महत्वाच्या घटकांचा विचार करून राज्यातील जनतेचे शाश्वत सर्वांगिण कल्याण साधेलतसेच संपूर्ण जगाला मार्गदर्शक ठरेल असेत्यांनी धोरणे आखली व ती राबविली होती. यावरून असे म्हणता येते की आधुनिक काळातील शाश्वत विकास ध्येयांचा विचार हा छत्रपती शिवाजी महाराजांनी आधिच केलेला होता.आपल्यालायाचीप्रचिती त्यांच्या विविध धोरणांमध्ये दिसून येते. म्हणून प्रस्तुत शोध निबंध याच बाबींचा पद्धतशीर व प्रामाणिक अभ्यास करण्याच्या दृष्टिकोणातुन लिहिण्यात येत आहे.

**बीजसंज्ञा :-** शाश्वत, प्रतिबिंब,धोरण,आज्ञापत्रे,लोककल्याणकारी.

**प्रस्तावना :**

ऐकविसाव्या शतकात संपूर्ण जग विविध समस्यांनी पीडित असतांना अशावेळी छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण येते ती त्यांनी त्यांच्या राजवटीत राबवलेल्या लोककल्याणकारी धोरणांमुळे. बदलत्या परिस्थितीनुसार संघर्षाची कारणे, युध्द करण्याची साधने किंवा हत्यारे जरी बदलली तरी पण दुसऱ्याला नेस्ताबुत करुन त्याच्यावर आपले वर्चस्व स्थापन करण्याची मुळ मानसिकता मात्र बदलली नाही. त्यामुळेच शिवछत्रपतींच्या इतिहासातील प्रेरणा या आजही आपल्याला मार्गदर्शक ठरतात.याचा प्रत्यय संयुक्त राष्ट्रसंघाने निर्धारीत केलेल्या शाश्वत विकास ध्येयांच्या बाबतीत दिसुन येतो.छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या राजवटीत राबविलेल्या लोककल्याणकारी धोरणांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास, शांतता आणि सुशासन,पायाबुत सुविधा,उद्योग व रोजगाार निर्मिती,चांगल्या दर्जाची कामे, शाश्वत वसाहतीची निर्मिती, जलसंवर्धन, वननीती,

शेती, कौशल्यपुर्ण शिक्षण, चांगले स्वास्थ, सर्वांना समान संधीची उपल्बदता, स्त्रियांचा सन्मान अशा विविध घटकांचा समावेश होता.सन २०१२ मध्ये रियो दि जनेरियो,ब्राझिल येथे संयुक्त राष्ट्र संघाच्या संमेलनात एकुण '१७'शाश्वत विकास ध्येयांचा विकास करण्याात येऊन. ही ध्येय सन २०१५ ते २०३० या कालावधी करीता निश्चित करण्यात आली.

शाश्वत विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये हे निश्चित केले जाते की वर्तमान पिढीच्या गरजा पुर्ण करण्याबरोबरच भावी पिढीच्या गरजा सुध्दा पुर्ण होईल. युनेस्कोने आखुन दिलेल्या '१७'शाश्वत विकास ध्येयांचा सविस्तर अभ्यास केल्यास असे दिसुन येते की १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या लोककल्याणकारी ध्येय धोरणात सध्याच्या शाश्वत विकास ध्येयांचा अंर्तभाव केलेला होता या वरुन असे म्हणता येईल की सध्याच्या शाश्वत विकास ध्येयांचे प्रतिबिंब छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ध्येय धोरणात दिसुन येते.

**परिकल्पना:**

१) विद्यमान काळातील शाश्वत विकासाची ध्येय ही पूर्णता नवीन नाही.

२) शाश्वत विकास ध्येयांचे प्रतिबिंब छत्रपती शिवाजी महाराज यांनी राबविलेल्या धोरणांमध्ये दिसून येतात.

**उद्दिष्टये :**

१) युनेस्कोने प्रसिध्द केलेल्या शाश्वत विकास ध्येयांचा अभ्यास करणे.

२) छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या राजवटीत अवलंबविलेल्या विकासात्मक धोरणांचा अभ्यास करणे.

३) त्यांच्या धोरणांमध्ये आजच्या शाश्वत विकास ध्येयांचे प्रतिबिंब दिसते का याचा अभ्यास करणे.

४) विद्यमान शाश्वत विकास ध्येय आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्वांगीण शाश्वत विकास धोरणांचे तुलनात्मक अध्ययन करणे.

**संधोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक व व्दितीयक संग्रहन पध्दतीचा वापर करण्यात येइल.

**ऐतिहासिक पार्श्वभुमी :-**

**शिवकाळ १६३०-१६८०:-**

भारतभुमी व भारतीय संस्कृतीच्यासंरक्षणासाठी सदैव तत्पर असणाऱ्या सह्यांद्रीच्या छायेत शिवनेरी किल्ला आहे. याच ऐतिहासिक किल्यात १९ फेब्रुवारी १६३० रोजी विश्वाला दिशा दाखविणारे एक 'बाळ' जन्माला आले ते म्हणजे स्वराज्य संस्थापक लोककल्याणकारी राजे छत्रपती शिवाजी महाराज होय.अवघ्या ५० वर्षाच्या आयुष्यात विश्वाला सदैव मार्गदर्शन ठरेल असे शाश्वत व समावेशी आर्थिक, सामाजिक, राजकीय विकास साधणारे लोककल्याणकारी धोरण छत्रपती

शिवाजी महाराजांनीत्यांच्या राजवटीत राबविले होते.

**सन १९७२:-**

५ जुन ते १६ जुन १९७२ मध्ये स्वीडनच्या स्टॉकहोम शहरात संयुक्त राष्ट्रसंघाचे मानव पर्यावरणावर संमेलन आयोजित करण्यात आले.

**सन १९८०:-**

IUCN व्दारा प्रसिध्द केलेल्या विश्व संरक्षण रणनीती मध्ये शाश्वत विकास या संकल्पनेचा पुर्वाभास दिसुन आला.

**सन १९८२:-**

या वर्षी संयुक्त राष्ट्र संघाच्या साधारण सभेत 'World Charter of Nature'चा स्विकार करण्यात आला.

**सन १९८३:-**

या वर्षी जागतिक पर्यावरण आणि विकास आयोग (World Commssion Environment and Development / WCED) ची स्थापना करण्यात आली.

**सन १९८४:-**

WECD / Brundland Commission या आयोगाने संयुक्त राष्ट्र संघाच्या साधारण सभेची स्वतंत्र संस्था म्हणुन कार्य सुरु केले.या आयोगाव्दारे १९८७ मध्ये सादर केलेल्या 'Our Common Future' या अहवालात 'Sustainable Development' ही संकल्पना व्याख्यासहीत सर्वप्रथम सादर केली गेली.

**सन १९९२:-**

रियो दि जनेरियो येथील 'Earth Summit'परिषद मध्ये 'Agenda 21'मान्य केला गेला आणि शाश्वत विकासाकरीता 'Commission on Sustainable Development' ची स्थापना करण्यात आली.

**सन २०००:-**

संयुक्त राष्ट्र संघाच्या संमेलनात गरीबी कमी करण्यासाठी आणि इतर ध्येय प्राप्तीसाठी 'Mileniyam Development Goals' चा स्विकार करण्यात आला.

**सन २०१२:-**

या वर्षी रियो दि जनेरियो,ब्राझिल येथे आयोजित संयुक्त राष्ट्र संघाच्या संमेलनात एकुण '१७'शाश्वत विकास ध्येयांचा विकास करण्याात आला.

**सन २०१५:-**

या वर्षी संयुक्त राष्ट्र संघाने जगाला बदलविण्यासाठी सन २०१५ ते २०३० या कालावधी करीतासर्वसमावेशक एकुण '१७' शाश्वत विकास ध्येयांची एका मतदानाच्या माध्यमातुन निवड केली.

**शाश्वत विकासाची संकल्पना :-**

शाश्वत विकास ही एक अशी दीर्घकालीन प्रक्रिया आहे की ज्यामध्ये हे निश्चित केले जाते की वर्तमान पिढीच्या गरजा पुर्ण करण्याबरोबरच भावी पिढीच्या गरजा सुध्दा पुर्ण होईल. शाश्वत विकास हा आर्थिक विकास आणि पर्यावरण संतुलन यांच्यातील सामंजस्याबद्दल बोलतो. कोणत्याही देशाचा

विकास शाश्वत आणि प्रगतिशीर तेव्हाच होऊ शकतो जेव्हा वर्तमान आणि भविष्य सुरक्षित असेल.याच संकल्पनेवर शाश्वत विकास आधारित आहे.

**शाश्वत विकास ध्येयांचा उद्देश :–**

शाश्वत विकास ध्येयांचा उद्‌देश आपले जग वाचविणे,गरिबी आणि असमानता संपविणे,सर्वांसाठी समान न्याय,सुरक्षित,शांत,समृध्द आणि राहण्यायोग्य जग निर्माण करणे हे आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे शाश्वत सर्वांगिण विकासाचे लोककल्याणकारी धोरण :–**

छत्रपती शिवाजी महाराज्यांनी त्यांच्या राजवटीत संपुर्ण रयतेच्या कल्याणासाठी शाश्वत सर्वांगिण विकासाचे लोककल्याणकारी धोरण खालीलप्रमाणेराबविल्याचे दिसुन येते.

१) पर्यावरणविषयक धोरण २) जलव्यवस्थापन धोरण ३) शाश्वत शहरांची निर्मिती ४) समानतेचे धोरण

५) शेतीविषयक धोरण ६) साधनसंपत्तीच्या वापराविषयी धोरण ७) आरोग्य ८) सार्वजनिक स्वच्छता

९) संशोधन १०) शिक्षण ११) न्याय १२) व्यापार १३) युध्द १४) चलनविषयक १७) रोजगार १८) संरक्षण

**संयुक्त राष्ट्र संघ व्दारा घोषित सध्याचे शाश्वत विकास ध्येंये :–**

संयुक्त राष्ट्र संघ व्दारा घोषित सन २०१५ ते २०३० या कालावधीकरीता सध्याचे सतत विकास ध्येंये ही खालीलप्रमाणे आहे.

१) गरीबी नाही २) शुन्य भुक३) चांगले आरोग्य आणि कल्याण४) दर्जेदार शिक्षण ५) लिंग समानता

६) स्वच्छ पाणी आणि स्वच्छता७) परवडणारी आणि स्वच्छ ऊर्जा८)सभ्य काम आणि आर्थिक वाढ

९)उद्योग नवकल्पना आणि पायाभुत सुविधा१०) असमानता कमी करणे११)शाश्वत शहरे आणि समुदाय

१२) जबाबदार वापर आणि उत्पादन१३) हवामान क्रिया१४) पाण्याखाली जीवन१५) जमिनीवरील जीवन

१६) शांतता आणि न्याय मजबूत संस्था१७) ध्येयांसाठी भागीदीरी

**छत्रपती शिवाजी महाराजांचे शाश्वत सर्वांगिण विकासाचे लोककल्याणकारी धोरणे व सध्याचे शाश्वत विकास ध्येंये यांच्यातील समानता :–**

**१) गरीबी निर्मुलन** :–संयुक्त राष्ट्र संघ व्दारा प्रसिध्द केलेल्या सध्याच्या शाश्वत विकास ध्येयांमध्ये पहील्या क्रमांकाचे ध्येय हे ‘गरीबी नको’हे आहे.गरीबीमुळेच विविध समस्यांची निर्मिती होते.गरीबीचे निर्मुलन केल्यास भुकमारी,आरोग्य तसेच शिक्षणाच्या समस्या दुर होऊ शकतात.यासाठी रोजगार उपलब्ध करुन द्यावा लागतो.हे तत्व स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी

महाराजांनी ओळखले होते म्हणुन त्यांनी शेती,उद्योग,बांधकाम,व्यवसाय,संरक्षण,संशोधन,प्रशिक्षण इत्यादी क्षेत्रात रोजगार निर्माण केला.

**२) कौशल्य प्रशिक्षण :-** संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकास ध्येयातीलचतुर्थ ध्येय सर्वसमावेशक आणि गुणवत्तापुर्ण दर्जाचे शिक्षण सुनिश्चित करुन सर्वांसाठी आजीवन शिकण्याच्या संधीना प्रोत्साहन देणे हे आहे. सध्याच्या काळातगरीब मुले,ग्रामीण भागात राहणारी मुले, अपंग व्यक्ती, स्थानिक लोक व विशेषता असुरक्षित लोकसंख्येसाठी दर्जेदार शिक्षणाची गरज आहे. दर्जेदार शिक्षणाचा प्रभाव इतर शाश्वत विकास ध्येयांवर पडत असल्याने हे अतीशय महत्वाचे ध्येय आहे. शिवकाळात सुध्दा कौशल्यपुर्ण शिक्षणाला विशेषता सैनिकी शिक्षणाला अत्यंत महत्व दिले जात होते. तलवारबाजी, दांडपट्टा, घोडेस्वारी, इत्यादी युध्द कलेचे प्रशिक्षण तसेच भौगोलिक ज्ञान दिले जात होते.सैन्यात भरतीकरुन घेतांना सैनिकांची गुणवत्ता पाहुनच भरती केली जात होती.शिवकाळात शिक्षण घेण्याची सर्वांना संधी मिळत होती.

**३) स्त्रीयांविषयी धोरण :-**

लैंगिक समानता हा मानवी हक्क असुन सुध्दा २१ व्या शतकात महिलांवर अत्याचार होतांना दिसुन येते. महिलांवरील अन्याय दुर करण्याकरीता शाश्वत विकास ध्येयातील पाचवे ध्येय लैंगिक समानता प्राप्त करणे आणि सर्व महिला व मुलींना सक्षम करणे हे ध्येय निश्चित केले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांनी सुध्दा त्यांच्या राजवटीत महिलांवरील अन्याय दुर करण्याकरीता प्रयत्न केले आहे.शिवाजी महाराजांनी कधीही स्त्री-पुरुष असा भेदभाव केला नाही. त्यांनी सदैव महिलांचा आदर, योग्य सन्मान व संधी देण्याचे कार्य केले. त्यांच्या राजवटीत महिलांना कैद करण्यास बंदी होती.शत्रु पक्षातील किल्लेदार सावित्रीबाई देसाई यांचा अवमान करणाऱ्या स्वत:च्या सरदारांना सुध्दा शिक्षा केली होती.

**४) जलव्यवस्थापन :-**

विद्यमान काही घटनांकडे लक्ष दिल्यास असे जाणवते की पाण्यासाठी रोजच संघर्ष करावा लागत आहे.पिण्यायोग्य पाण्याचे प्रमाण दिवसागणिक कमी होत असुन राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विविध प्रयत्न केले जात आहे.शिवछत्रपतींच्या जलनिति वरुन असे दिसुन येते की पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जलव्यपस्थापन हाच उत्तम पर्याय आहे. गाव तेथे तलाव, धरण, विहिर, किल्यावर सुध्दा विहीर, टाकी, तळे बांधुन पाण्याची व्यवस्था करणे तसेच विनाकारण पाण्याचा अपव्यय करण्यावर बंदी असे धोरण शिवरायांचे होते.

**५) सार्वजनिक स्वच्छता :-**

स्वच्छता किती महत्वाची आहे हे कोवीड-१९ ने संपुर्ण जगाला दाखवून दिले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले

बांधतांना तटामध्ये स्वच्छतेसाठी शौचकुप बांधुन स्वचछतेची काळजी घेतली होती. किल्ला जसा अभेद्य असावा तसाच तो सुंदर व स्वच्छही असावा यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असायचे. रायगडावरुन असे लक्षात येते की राजपरिवार, सैनिक, अधिकारी यांची राहण्याची जशी व्यवस्था होती अगदी त्याचप्रमाणे शौचालयाची व्यवस्था सुध्दा गडावर केली होती.

**६)संशोधन व नवीन उपक्रम :-**

शाश्वत विकास ध्येय नऊ मध्ये लवचिक पायाभुत सुविधा निर्माण करण्यास तसेच सर्वसमावेशक आणि शाश्वत औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन दिले आहे.या करीता सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांवर चिरस्थायी उपाय शोधण्यासाठी संशोधन व नवीन उपक्रम राबविणे आवश्यक आहे.शिवाजी महाराजांनी नवीन उपक्रमाच्या माध्यमातुन शाश्वत औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन दिले आहे. दुर्गबांधणी, शस्त्रसंशोधन, छापखाना, पोलाद कारखाना, संदेशवहनाचे माध्यम, चलन र्निमिती, आधुनिक जहाज बांधणी, युध्दाची हत्यारे अशा अनेक गोष्टींत नवर्निमिती दिसुन येते. बदलत्या काळाची गरज ओळखुन भारतीय नौसेनेची निर्मिती छत्रपती शिवाजी महाराजांनी केली.

**७) पायाभुत सुविधा :-**

शाश्वत विकासाकरीता पायाभुत सुविधा असणे आवश्यक आहे.शिवाजी महाराजांनी सुध्दा स्वराज्याचा विस्तार करतांना राज्यात रस्ते,पाणी,संदेशवहन,तत्कालीन इंधनाचे लाकुड यासारख्या पायाभुत सुविधा निर्माण केल्या.

**८) समानतेचे धोरण :-**

शाश्वत विकास ध्येय दहाचे उद्दिष्ट उत्पन्नातीलविषमता,वय,जात,लिंग,वंश,मुळ,धर्म ,यावर आधारीत असमानता कमी करणे आहे. राजेशाही असो की लोकशाही कोण्त्याही शासन व्यवस्थेत सर्व समाजाचा सर्वांगीण विकास साधणे तसेच संरक्षणाची भुमीका पार पाडण्याची जबाबदारी ही शासनाची असते.एखादा समाज घटक दुसऱ्या घटकावर धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकिय अन्याय करीत असल्यास हा अन्याय दुर करण्याचे कार्य शासनालाच करावे लागते.छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या राजवटीत सर्व जातीपातीच्या लोकांना समानतेची वागणुक देवुन सर्वांगीण विकासाची समान संधी उपल्बध करुन दिली होती.

**९) शाश्वत शहर :-**

मानवी वसाहती, शाश्वत सर्वसमावेशक, सुरक्षित, लवचिक, आणि टिकाऊ बनविण्याचे ध्येय संयुक्त राष्ट्र संघ व्दारा निश्चित केले आहे. अगदी याच प्रकारचे धोरण छत्रपती शिवाजी महाराजांचे शाश्वत शहराविषयीचे होते.शिवकालीन स्थापत्याचा विचार करतांना किल्ल्यांच्या रचनेचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते.किल्ले बांधतांना सर्व

गोष्टींचा विचार करुन चिरकाल टिकणारी, मजबुत स्वरुपाची, सर्व सुविधा युक्त असे किल्ले बांधली गेली. किल्ले बांधतांना राहण्याकरीता घरे, पाण्याची व्यवस्था, शौचकुप, दिवाबत्ती, स्वछता, जळाऊ इंधन, वैद्यकीय सुविधा, बगीचा, बाजारपेठ, रोजगारीची उपल्बधता, आर्थिक सुविधा, संरक्षण इत्यादी सुविधांचा पर्यावरणास पुरक अशा गोष्टींचा विचार करुन निर्माण केल्या जात होत्या. शिवछत्रपतींच्या विविध किल्लांवरील मागील भागात असलेल्या मोकळया जागेत कचऱ्यापासुन खत तयार करुन त्यापासुन भाजीपाला,विविध फळे, औषधिय वनस्पती अशा प्रकारचे उत्पादन घेतले जात होते.शिवछत्रपतींचा किल्ला म्हणजे शाश्वत, सर्वसमावेशक, संपन्न, सर्व साधन संपत्तीने परिपुर्ण असे शहरच होते.

**१०) मजबुत न्याय संस्था :-**

शाश्वत विकास ध्येयांच्या माघ्यमातुन शांततापुर्ण परिस्थिती व सर्व समाजांना न्याय मिळवुन देण्यासाठी सर्व स्तरावर प्रभावी व जबाबदार न्याय संस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.शिवकाळात शिवाजी महाराजांनी त्यांच्या अष्टप्रधान मंडळात न्यायधिशाला महत्वाचे स्थान दिले होते. त्यांनी आपल्या न्याय व्यवस्थेत न्यायधिश आणि पंडितराव ही दोन पदे निर्माण करुन यांच्या मार्फत हिंसाचार, शोषण, तस्करी सारख्या अन्यायापासुन रयतेचे रक्षण केले.

वरील विविध मुद्द्यांच्या विश्लेषनावरुन असे निर्देशनास येते की छत्रपती शिवाजी महाराजांचे १७व्या शतकातील शाश्वत सर्वांगिण विकासाचे लोककल्याणकारी धोरणे व सध्याचे शाश्वत विकास ध्येंये यांच्यात बरेच साम्य आढळुन येते.छत्रपती शिवाजी महाराजांच्या धोरणांचा प्रभाव विद्यमान शाश्वत विकास ध्येयांवर झाल्याने सध्याच्या शाश्वत विकास ध्येयांचे प्रतिबिंब छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजवटीत राबविलेल्या धोरणांमध्ये दिसुन येते.

**निष्कर्ष :-**

उपरोक्त विस्तुत अभ्यासाअंती असे आढळुन येते की आधुनिक काळात संयुक्त राष्ट्र संघ व्दाराशाश्वत विकास ध्येय जरी निर्धारीत केली असली तरी त्या सर्वांचे प्रतिबिंब छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या राजवटीत राबवलेल्या ध्येय, धोरणांमध्ये आढळुन येते. विद्यमान परिस्थितीत संपूर्ण जगाच्या अस्तित्वाकरीता संयुक्त राष्ट्र संघटनेने आखुन दिलेल्या शाश्वत विकास ध्येये तसेच शिवछपतींच्या लोककल्याणकारी धोरणांची नितांत आवश्यकता आहे.जगातील सर्व राष्ट्रातील विविध स्तरावरील शासन व्यवस्थांनी शाश्वत विकासाची ध्येय तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोककल्याणकारी धोरणांचा विचार करुन आधुनिक काळातील सर्व प्रकारची धोरणे आखावी.

**संदर्भ :-**

जयसिंगराव पवार, 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे', मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे(२००५)

नामदेवराव जाधव, 'शिवाजी महाराजांचे अर्थशास्त्र' राजमाता प्रकाशन, मुंबई (२०१३)

गिरीश प.जाखोटिया,'छत्रपती शिवाजी महाराज',साकेत प्रकाशन,औरंगाबाद (२०१४)

विलास सोनावने, 'रयतेचा राजा' लोकायत प्रकाशन,सातारा (२०१०)

''छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र''

भिकाम सिंह, 'सतत विकास', कोस्तुभ प्रकाशन (२०१९)

शैलेंद्र कुमार सिंह, संजय कुमार पासवान, एच.के.सिंह, 'सतत सामाजिक विकास', नालंदा पब्लिकेशन (२०२०)

World Health Organazation http://www.who.int

United Nations Development programme https://www.un.org